## डॉ. श्री. वा. सोहोनी
**कुलगुरू, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ**
**५ फेब्रुवारी, १९९३**

महामहीम राज्यपालजी, मा. कुलगुरू, विद्यापीठाच्या वेगवेगळ्या विद्याशाखांचे अधिष्ठाते, विधीसभेचे व कार्यकारिणीचे सदस्य, आज प्रमाणपत्रे प्राप्त करणारे पदवीधर आणि बंधुभगिनीनों,

शिवाजी विद्यापीठाच्या या पदवीदान सभारंभात मला आपण दीक्षांत भाषण देण्यासाठी निमंत्रित केले हा मी माझा मोठा बहुमान मानतो, आणि त्यासाठी आपले मन:पूर्वक आभार मानतो.

दीक्षांत समारंभात अशा प्रकारच्या भाषणात दोन प्रमुख विषय यावेत, अशी पूर्वापार पद्धत मानली गेली आहे –

१) स्नातकांना उपदेश आणि २) कुठच्यातरी शैक्षणिक विषयाचा उहापोह.

मी प्राचीन भारतीय शिक्षण व्यवस्थेविषयी पहिल्यांदा सांगणार आहे. परधर्म सहिष्णुतेचे बिल आपल्या देशातल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत कसे समाविष्ट झाले होते ते जाणणे सांप्रत काळाची गरज असल्यामुळे तो चर्चेचा विषय झाला आहे. त्यामुळे या शिक्षणपद्धतीचे विवरण,स्नातक–छात्रवृंदाना करावयाच्या उपदेशाची स्वतः स्पष्ट पार्श्वभूमी होते. तिचे अंतरंग जाणणे अतिशय महत्त्वाचे आहे.

प्रिय स्नातकवृंद आणि छात्रगण, आपली भारतीय संस्कृती प्राचीन काळापासून अत्यंत समृद्ध आणि प्रगतीशील अशी मानली जाते. राष्ट्रीय शिक्षणाचा एक प्रमुख उद्देश चारित्र्यवर्धन हा आहे. आपल्या प्राचीन शिक्षणपद्धतीमध्ये गुरु, आचार्य, उपाध्याय, छात्र, अंतेवासी इत्यादी अनेक महत्त्वाच्या संज्ञा आहेत.

‘छात्र किंवा ‘छात्रा’ अशी संज्ञा अशा विद्यार्थी–विद्यार्थिनींना लागू पडते. ज्यांच्या मनामध्ये आपल्या गुरुजनांविषयी आदराची भावना आहे आणि त्या आदराच्या भावनेतून आवश्यकता असेल तेव्हा त्या गुरुजनांवर छत्र धरण्याचा अधिकारही त्यांना प्राप्त झाला आहे.

प्राचीन शिक्षण पद्धतीमध्ये ऋषींचे स्थान काय होते त्याचा विचार व्हावयाला हवा. जंगलात आश्रम बांधून तपश्चर्या करणाऱ्या तापसांना ‘ऋषी’ म्हणावयाचे, ही समजूत चुकीची आहे. ऋषी ह्या शब्दाचा अर्थ – ‘गतिमान व्यक्तीमत्व’’

‘‘ऋषी इत्येव गतौ धातु: श्रुतौ सत्ये तपस्यथ।
एतत् सांनियतस्तस्मिन् ब्रह्मणास ऋषि: स्मृत: ।।’’

हल्लीच ‘कृषीमहर्षी’, ‘राजर्षी’ या शब्दांचा प्रयोग आपण करतो. कृषिक्षेत्रामध्ये ज्यांनी आपले

गतीमान व्यक्तिमत्त्व दाखविले त्यांना 'कृषी महर्षी' म्हणायचे. ''राजर्षी'' राजा राहून निरनिराळ्या क्षेत्रात ज्यांनी गतीमान व्यक्तीमत्त्वाचा ठसा उमटविला त्यांना 'राजर्षी' म्हणावयाचे. उदा. राजर्षी छत्रपती शाहू महाराज, ज्यांचा शिक्षणक्षेत्रात उज्ज्वल वारसा आपल्या शिवाजी विद्यापीठाला आदर्शभूत होऊन तो जतन करावयाचा आहे.

'आचार्य' अशा शिक्षकांना म्हणायचे की, जे स्वत:च्या आचरणात उच्च आचाराचे पालन करतान व ते आचार आपल्या विद्यार्थ्यांना शिकवितात आणि त्यांच्यात रुढ करावयाचा प्रयत्न करतात.

'उपाध्याय' अशा व्यक्तींना म्हणावयाचे, जे छात्रांना समक्ष उद्देशून त्यांचेवर शिक्षणाचा संस्कार घडवितात. या आधारावर उपनिषदे निर्माण केली गेली होती.

स्वत:च्या शिक्षणाकरिता व निर्मळ संस्कारांच्या प्राप्‍ तीकरीता जे छात्र गुरुजनांजवळ राहतात किंवा असतात त्यांना 'अंतेवासी' म्हटले जात असे.

आता 'गुरु' या शब्दाचा अर्थ पाहू या ''गुमज्ञानान्धकारं रु रुन्धयति इति गुरु : ।'' अर्थात अज्ञानरूपी अंधाराला जो अडवून ठेवतो, तो गुरु. त्यानंतरचा महत्त्वाचा विचार म्हणजे भगवान बुद्धांनी सांगितल्याप्रमाणे, 'आत्मप्रदीप' व्हायला हवे.

आपल्या देशात जी प्राचीन शिक्षणपद्धती होती, त्या पद्धतीत छात्रवृंदास अनुलक्षून, उपदेश देण्याचे समारंभ संपन्न होत असतं. या शिक्षण पद्धतीच्या विषयी विस्तृत माहिती सातव्या शतकात चीन देशातून भारतात आलेल्या इत्–सिंग नावाच्या चीन बौद्ध भिक्षुने लिहून ठेवली आहे. त्याच्या वर्णनानुसार स्नातकांना उद्देशून असा उपदेश दिला जात असे–

'सत्यं वद । धर्मं चर । स्वाध्यायात् मा प्रमद : ।
सत्यात् न प्रमदितव्यम् । धर्मात न प्रमदितव्यम् । कुशलात न प्रमदितव्यम् ।
भूत्यै न प्रमदितव्यम् । स्वाध्यायप्रवचनाभ्यां न प्रमदितव्यम् ।।
मातृदेवो भव । पितृदेवो भव । आचार्य देवो भव । अतिथीदेवोभव ।
यानि अनवधानि कर्माणि तानि त्वया सेवितव्यानि । नो इतराणि ।
यानि अस्माकं सुचरितानि तानि त्वया उपास्वानि ।
एष: आदेश: । एष उपदेश: । एतत् अनुशासनम् । एवम् उपासितव्यम् ।''
अर्थात

''सत्य बोला. स्वकर्तव्य करा. आपल्या अध्ययनापासून परावृत्त होऊ नका.
''सत्यापासून ढळू नये, कर्तव्यापासून च्युत होऊ नये. कल्याणापासून दूर जाऊ नये.

उत्कर्षापासून दूर जाऊ नये. स्वत:चे अध्ययन व अध्यापन सोडू नये.

आईला देवासमान माना. वडिलांना देवासमान माना. गुरुजींना देवासमान माना. अतिथींना देवासमान माना. राष्ट्राला देवासमान माना.

जी सत्कर्मे आहेत, तीच करावीत, इतर करू नयेत. आम्ही जी प्रशस्त कर्मे केली आहेत, तीच करावीत.

असा आदेश आहे, असा उपदेश आहे, असा अनुभवबोध आहे, असे आचरण करावे.

आपले चारित्र्य सर्व दृष्टींनी निर्मल ठेवणे आणि सामाजिक संयमाचा लाभ इतरांना देणे हे, प्रिय स्नातकगण, तुमचे प्राथमिक कर्तव्य आहे. सामाजिक संयम म्हणजे काय, यासंबंधी चार शब्द सांगणे आवश्यक आहे. कारण 'संयम: खलु जीवनम्'' संयम म्हणजे मन आणि बुद्धी या दोहोंवर चांगले नियंत्रण ठेवणे. मन किंवा चित्त म्हणजे ज्या काही घटना होतात त्यांची आठवण ठेवण्याची जागा. बुद्धी म्हणजे त्या आठवणींचे मोजमाप. अर्थात त्या बऱ्यावाईट ठरविण्याचे साधन. मनावर ताबा ठेवणे हे चांगल्या संस्काराकरिता प्रवृत्तीकरिता आवश्यक मानले गेले आहे. श्री संत तुकाराम म्हणतात – ''मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धीचे कारण । मन माऊली सकलांची ।।'' आपल्या आयुष्यात ही साधना सतत व्हायला हवी. सद्बुद्धीचे मुख्य गुण विवेक आणि नि:स्वार्थ आचरण हे होत. समाजाच्या सर्व घटकांच्या संपूर्ण हिताकरिता संयम ठेवावा. याच नितीवर आधारित असे स्वत:चे व्यक्तीगत ध्येय निश्चित करावे. ज्या महान व्यक्तीत असे ध्येय आविष्कार पावले असेल त्यांचे नित्य स्मरण ठेवावे. सर्व विभक्त धर्मपद्धतीत जे अविभक्त तत्त्व आहे आणि तेच सात्त्विक ज्ञान मानावे – ''अविभक्तं यद् विभक्तेषु तद् ज्ञानम् सात्विकं विदु: ।''

आपल्या देशात फार प्राचीन काळापासून ज्ञान आणि विज्ञान या दोघांची क्षेत्रे भिन्न भिन्न, असे मानले जात असे. श्रीमद्‌भगवद्‌गीतेत म्हटले आहे की–

''ज्ञानं ते अहम् सविज्ञानम् इदं वक्ष्यामि अशेषत: ।
यद् ज्ञत्वा नेह भूयो अन्यत् ज्ञातव्यम् अवशिष्यते ।।''

पाचव्या शतकातल्या अमरकोशात स्पष्ट केले गेले आहे –

''मोक्षेधीर्ज्ञानम्, अन्यत्र विज्ञानम्, शिल्पशास्त्रयो : ।''

आदि श्री शंकराचार्यांनी सांगितले आहे की,

''विज्ञानसहितम् अनुभव सहितम् । ''

श्री ामानुजाचार्यांनी सांगितले आहे की,

''विज्ञानं हि विविधाकारविषयं संज्ञानम् ।''

श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

''अर्जुना, तया नाम ज्ञान । येर प्रपंचु, विज्ञान ।।''

हे विज्ञान प्राचीन भारतात फार विकसित झाले होते, याची कल्पना आता येत आहे. दिल्लीचा लोहस्तंभ त्या विस्ताराचा साक्षीदार उभा आहे.

प्रिय बालमित्रांनो, आपले बोलणे चालणे शुद्ध ठेवायला हवे. 'एक: शब्द: सम्यग उक्त:, सम्यक प्रयुक्त:, स्वर्गे लोकेच कामधुग् भवति।'' त्यामुळे सर्वांचा आदर ठेवला जातो. प्रांताप्रांतातले सर्व लोक एकाच राष्ट्राचे संयुक्त घटक आहेत. आपण सर्व एक आहोत ही भावना दृढ करणे सुलभ होते. भाषा ही जोडणारी शक्ती आहे, आणि असावी; तोडणारी नाही आणि नसावी.

सध्या परमपूज्य स्वामी विवेकानंदांच्या आयुष्यातील एका विशिष्ट घटनेसंबंधी शताब्दीचे उत्सव चालू आहेत. उपनिषदांचे, ''उत्तिष्ठत, जाग्रत, प्राप्यवरान् निबोधत ।'', हे बोध वाक्य मानून, त्यांच्या रामकृष्ण मिशन या संस्थेने 'प्रबुध्द भारत' हे नियतकालिक चालविले आहे. ''द फ्युचर इन इंडिया' किंवा 'भारताचे भविष्य' या विषयावर व्याख्यान देताना स्वामीजी म्हणाले होते की – "Education is not the amout of information that is put into your brain and runs riot there, undigested, all your life. We must have life-building, man-making, character-making, assimilation of ideas. It ou have assimilated five ideas and made them your life and character, you have more education than any mans who has get by heart a whole library. The ass carrying its load of sandalwood knows onlyl the weight and not the value of the sandlewood. If education is identical with information, the libraries are the greatest sages in the world, and encyclopaedias are the Risis."

अर्थात केवळ पुष्कळ माहिती जमवून त्या माहिती मुख्य तत्त्वे समजून घेण्याऐवजी जन्मभर त्याविषयी फक्त मनातल्या मनात विचार करीत राहणे – हे खरे शिक्षण नव्हे. आपण आपल्या आयुष्याचे ध्येय निश्चित करून ते साध्य करण्याच्या दृष्टीने, व्यक्तीमत्त्वाचा विकास करण्याकरिता संबंधित ज्ञानाचे पूर्ण आकलन केले पाहिजे. तुम्ही केवळ पाच कल्पना आत्मसात करून त्यानुसार आपल्या आयुष्याचे कार्य कसे असावे, हे ठरवून प्रयत्न केलेत, तर एखाद्या वाचनालयातील सर्व पुस्तके, त्यांचा अर्थ समजावून न घेताच ती पाठ करणाऱ्या व्यक्तीपेक्षा अधिक सुशिक्षित आहात. चंदनाचे ओंडके वाहून देणाऱ्या गाढवाला त्या चंदनाच्या वजनाचीच फक्त जाणीव असते, त्याच्या विशेष गुणांची तिळभरही कल्पना नसते. खरे शिक्षण आणि नुसती माहिती हे दोन्हीही एकच मानले जाऊ लागले, तर वाचनालयेच जगातील श्रेष्ठ तत्त्वज्ञ ठरतील आणि ज्ञानकोश ऋषी मानावे लागतील.

जवळजवळ ७० वर्षांपूर्वीची आठवण – ''इथेच थारा पराक्रमाला म्हणूनि देवा, जन्म आला'', हे विसाव्या शतकातील मुंबईत स्वातंत्र्यलढ्याचे प्रभातफेरीचे गीत होते. ही घटना आठवणारी मंडळी आता फारशी राहिलेली नाहीत. परंतु आमच्या मुंबईकर बालमनावर त्याचा फार गंभीर परिणाम झाला. ''तो शिकवितो या सेवेला, म्हणुनी देवा, जन्म झाला.'' हे त्या गीताचे पालुपद होते ''तो'' म्हणजे ''महात्मा गांधी''.

अगदी अलिकडे, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे जुने कागद पाहताना महात्मा गांधींचे टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या १९२४ च्या पदवीदान समारंभाच्या प्रसंगी जे भाषण झाले होते, त्या भाषणाचा काही अंश हाती आला. त्या काळात म्हणजे १९२१ ते १९२३ च्या अवधीत टिळक महाराष्ट्र विद्यापीठावर परकीय सत्तेच्या, म्हणजे इंग्रजांच्या शासनाच्या, सी.आय.डीच्या धाडी वरचेवर पडत असत. जे काही त्यांना आक्षेपार्ह वाटत असे ते उचलून नेत असतं. महात्माजींच्यां भाषणाचे काही कागद कसे मागे राहिले कोण जाणे ! परंतु जे आता मिळाले, ते लाख मोलाच्या विचारांनी भरलेले आहे. ते विचार आताच्या पदवीदान समारंभात उद्‌धृत करणे आवश्यक आहे. कारण सध्या दुसऱ्या दिशांतून अनेक दुष्ट आणि घातक धाडी, उच्च शिक्षणक्षेत्रात येत आहेत.

महात्माजींनी शिक्षकवर्ग आणि पदवी मिळविणारे विद्यार्थी या दोघांना उद्देशून हे भाषण हिंदीत केले होते.

''मेरे ख्याल से, विद्यापीठ से यहि कार्य होना चाहिए कि विद्यापीठ के शिक्षकोंने और विद्यार्थियोंने स्वराज्य मिलाने के लिए प्रयत्न करना चाहिए।'' म्हणजे विद्यापीठातल्या शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी स्वराज्य मिळवायला प्रयत्न केले पाहिजे. महात्माजी पुढे म्हणाले की, ''विद्या देने का हेतु यह है कि, आदमी अच्छा गृहस्थाश्रमी बनें, लडके–बच्चोंका अच्छी तरह से पोषण करे, संसार न छोडे और अपने कर्तव्य का निष्ठापूर्वक पालन करे।''

त्यानंतर त्यांनी असे सांगितले की, ''दुसरी बात : स्वभाषा का अभिमान रखो। इतिहास जाननेवालोको मालूम होगा की, दक्षिण आफ्रिका मे जब बोअर युद्ध शुरू था, उस वक्त जनरल बोथा और जनरल क्रूगर ये दो बोअर लोगों के सेनापति थे। लेकीन जब अंग्रेजों से उन्हे तह करना पडा उस वक्त उन्होंने दुभाषा की सहाय्यता लेकर सब बातचित डच भाषा में ही की थी। '' ज्या बोअर नेत्यांचा महात्माजींनी उल्लेख केला ते, व त्यांचे अनुयायी, दक्षिण आफ्रिकेत महात्माजींचे विरोधक होते तरीसुद्धा त्यांच्या गुणांचा उल्लेख करून महात्माजींनी आपल्या मनाचा मोठेपणा दाखविला. ''गुणाः पूजास्थानम् गुणिषु।''

१९३४–३५ मध्ये एका उत्तुंग आणि महान व्यक्तीमत्वाचा मला परिचय झाला. त्यावेळी मी मुंबईच्या गव्हर्नमेंट लॉ कॉलेजमध्ये एलएलबीच्या वर्गातील एक विद्यार्थी होतो. आमच्याकरिता मुंबईतील त्यावेळचे अनेक विख्यात कायदेतज्ज्ञ वर्ग घेत असत. त्यापैकी एक डॉ. बॅरिस्टर बाबासाहेब आंबेडकर हे होते. त्यांनी दिलेली व्याख्याने सर्व छात्रवृंदाच्या मनावर अतिशय परिणामकारक होत असतं. वेशभूषा पाश्चात्य पद्धतीची, पनामा कापडाचा सूट, सुंदर पॉलिश केलेले बूट, नेकटायची अतिशय कौशल्याने बांधलेली गाठ, ही त्यांची वैशिष्ठ्ये कोणाच्याही चटकन लक्षात येत असत. व्याख्यान देताना आवाज मोठा धीरगंभीर. ते आम्हाला सामंडचे ज्युरिस्पुडन्स शिकवीत असतं. या विश्वविख्यात ग्रंथात धर्म, पंथ आणि नितीमूल्ये यांचे अतिसुंदर विवेचन केलेले आहे. या तीन शब्दांचे अर्थ कसे भिन्न भिन्न आहेत. आणि त्यांच्यात आपसात काय संबंध असू शकतो याविषयी बॅरिस्टर बाबासाहेब आंबेडकरांचे विश्लेषण अत्यंत मार्मिक होत असे. सांप्रतच्या काळात ती आठवण झाली म्हणजे तिचे महत्त्व अधिक पटते. त्या काळी आमचे हे प्राध्यापक अतिशय विद्वान, थोर अर्थशास्त्रज्ञ आणि कायदेतज्ज्ञ आहेत इतकेच आम्हा सर्व विद्यार्थ्यांना माहीत होते. आम्ही ऐकत असू की त्यांच्या निवासस्थानी, भिंतीच्या जवळी जमिनीपासून छतापर्यंत पुस्तके कपाटामध्ये लावून ठेवलेली आहेत; आणिती सर्व पुस्तके त्यांनी कधी ना कधी वाचलेली आहेत. वर्ग संपला म्हणजे आम्ही कधीमधी , ते जवळच्या विश्रांतीगृहात चहा प्यायला जात असत. तेथे जाऊन त्यांना प्रश्न विचारण्याचे धारिष्ट्य करत असू. त्यावेळी सुद्धा ते एखादे पुस्तक चहाच्या किटलीला लावून त्याचे वाचन करीत असताना दिसायचे. आम्ही गेल्यावर चेहऱ्यावर थोडेसे स्मित आणून (जे निमिषार्धातच लुप्त होत असे) ''काय विचारायचे आहे ते चटकन विचारा'' असे म्हणून ते आमच्या प्रश्नांची वाट पाहत असतं. या महान व्यक्तिमत्त्वाचा आमच्या मनावर दूरगामी परिणाम झाला यात नवल नाही. त्यांच्या पुढील आयुष्यात त्यांच्याकडून देशाचे , संविधानाच्या बाबतीत जे अनुपम कार्य झाले, ते तसे होईल अशी आमच्यापैकी कोणालाही कल्पना असणे शक्य नव्हते.

मुंबईच्या विधी महाविद्यालयात त्यांनी दिलेल्या व्याख्यानातून भारताच्या संविधानाची अनेक महत्त्वाची विधाने बीजरूपाने प्रकट होत असतं. त्यांचे अंकुर त्यांनी संविधानाच्या चौकटीत पल्लवित केले. हे नितांत सत्य आहे.

आपण सर्वजण आपल्या आयुष्यात ही महान ब्रीदवाक्ये सतत स्मरणात ठेवून आपला जीवनक्रम व्यतीत कराल, असा मला दृढ विश्वास वाटतो. आपल्या सर्वांच्या करिता माझी अशी मंगल कामना आहे की, आपले दीर्घ आयुष्य सपरिवार, सानंद, सकुशल आणि स्वस्थवृत्त व यशस्वी होवो.

❑❑❑